
# आपलं नांदेड शहर


नांदेड हे महाराष्ट्र राज्यातलं दहावं सर्वात मोठं शहर आहे आणि भारतातील ७९ वे सर्वाधिक लोकसंख्या असलेलं शहर आहे. मराठवाड्यातलं दुसरे मोठे शहर गोदावरी नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेलं आहे. नांदेड शहर महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात असून नांदेड जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे.




१.  **भौगोलिक :**

नांदेड शहराची समुद्रसपाटीपासूनची उंची ३६२.४२ मीटर आहे. नांदेड शहराचं क्षेत्र सुमारे ६३.२२ चौरस किलोमीटर आहे. नांदेड शहरातून गोदावरी नदी जाते. नांदेड शहराचे दोन भाग आहेत. जुने नांदेड आणि (गोदावरी नदीच्या उत्तर किनाऱ्यावर आहे) नवीन नांदेड, (नदीच्या दक्षिणेला) आहे. नांदेड शहर नांदेड जिल्ह्याच्या वायव्य दिशेला असून हे शहर उत्तर अक्षांश १९° १४' ते १९° १६' व पूर्व रेखांश ७७° ३१' ते ७७° ३२' दरम्यान पसरलेले आहे. शहराची लोकसंख्या इ.स २०११ च्या जनगणनेनुसार ५,५०,४३९ असून सन २०२५ ची अंदाजित लोकसंख्या ७,७३,००० आहे.

| एकूण कुटुंब संख्या : | | १,०२,९९७ | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विवरण | एकूण व्यक्ति | पुरुष | स्त्री |
| १ | लोकसंख्या | ५,५०,४३९ | २,८५,४३३ | २,६५,००६ |
| २ | बालक लोकसंख्या | ७१,१३३ | ३७,७८७ | ३३,३४६ |
| ३ | अनुसूचित जाती | १,०२,६७७ | ५२,९१२ | ४९,७६५ |
| ४ | अनुसूचित जमाती | १२,७३८ | ६,६७१ | ६,०६७ |
| ५ | साक्षर | ४,११,८६६ | २,२४,३२७ | १,८७,५३९ |
| ६ | निरक्षर | १,३८,५७३ | ६१,१०६ | ७७,४६७ |
| ७ | कामगार | १,६७,८०२ | १,३७,५८७ | ३०,२१५ |
| ८ | गैर कामगार | ३,८२,६३७ | १,४७,८४६ | २,३४,७९१ |



दक्षिण नांदेड



उत्तर नांदेड

## २. ऐतिहासिक वारसा:

या शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्र राज्यात दक्षिण टोकाला तेलंगाणा राज्याच्या सीमेलगत नांदेड जिल्हा वसलेला आहे. नांदेड शहर प्राचीन काळी नन्दिकड किंवा नन्दितट या नावाने ओळखले जात असे. "नांदेड" या नावाचा उगम "नंदी-तट" या शब्दामधून झालेला असून, "नंदी" म्हणजे भगवान श्री शंकराचे वाहन आहे आणि "तट" म्हणजे पवित्र गोदावरी नदीचा काठ, नंदीने गोदावरी नदीच्या किनार-यावर तपस्या केली असल्याची आख्यायिका आहे. नंदागिरी उर्फ नंदीग्राम या प्राचीन किल्ल्याच्या नावावरून या शहराला प्रथम नंदीग्राम आणि कालांतराने अपभ्रंश होऊन नांदेड हे नाव पडले असल्याचे सांगण्यात येते. हे शहर गोदावरीच्या उत्तर तीरावर वसलेले आहे सांची येथील स्तुपावरील दानलेखात एका नन्दिनगराचा उल्लेख आला आहे. हे नन्दिनगर म्हणजेच नांदेड असे काही संशोधकांचे मत आहे. या शिलालेखावरून तसेच या परिसरात सापडलेल्या पुरावशेषांवरून नांदेडचे प्राचीनत्व सातवाहन काळापर्यंत मागे नेता येते. एकूणच गोदावरीचे खोरे हे महाराष्ट्राचे प्राचीन वस्तीस्थान मानले जाते. प्रागैतिहासिक काळातील मध्यपुराश्मयुगीन हत्यारे नांदेड परिसरातील किवळा येथे मिळाली आहेत. रामायण-महाभारततातही नांदेडचे उल्लेख आढळतात. रामायणात राम रावणाचा वध करून परत जात असता त्याला नंदीग्राम लागले असा उल्लेख आढळतो. पांडव नांदेडमध्ये येऊन गेल्याचेही सांगितले जाते. पुढे ते कंधार म्हणजे पांचाळपूरला गेले. ऐतिहासिक काळाच्या प्रारंभी भारतात एकूण सोळा जनपदे अस्तित्वात होती. त्यापैकी अश्मक व मूलक ही दक्षिण भारतात होती. अश्मक जनपद हे दक्षिण भारतातील सर्वात प्राचीन जनपद. प्राचीन वाङ्मयात या जनपदाचा उल्लेख आढळतो. या अश्मक जनपदाची राजधानी पोटन म्हणजे आताच्या आंध्र प्रदेशातील निजामाबाद जिल्ह्यातील बोधन. बोधन नांदेड जिल्ह्याच्या सरहद्दीपासून अगदी जवळ आहे. यावरून नांदेड त्या काळी अश्मक जनपदाचा भाग असल्याचे सिद्ध होते. नंदवंशीयांनीही येथे सत्ता स्थापन केली. पैठण हे शहर नंद वंशीयांची दक्षिणेतील राजधानी होते तर -नंद आहार॰ किंवा-नवनंद डेरा॰ नावाने ओळखले जाणारे नांदेड हे उपराजधानीचे ठिकाण होते. नांदेड हे नाव नवनंद डेरा या नावाचे अपभ्रंश रुप आहे. रा.श्री.मोरवंचीकर यांच्या मते नांदेड ही उत्तरेकडील नंदांच्या सामाज्याची दक्षिणेतील सीमा होती. युआन त्सांग या चिनी प्रवाशाने ७ व्या शतकात नोंदविले आहे की, नंद घराण्यातील धनानंदची गोदावरी काठावरील नंदेडरा ही उपराजधानी होती. आजही लोकस्मृतीत नांदेड ही नंद व नवनंदाची राजधानी असल्याचे सांगितले जाते. सांची स्तुपावरील दानलेखात नन्दिनगर येथील अनेक बौद्ध भिक्षु-भिक्षुणी तसेच इतर नागरिकांची नावे आली आहेत. यावरून नांदेड हे दक्षिणेतील एक बौद्धपीठ असल्याचे दिसते. अमरावतीहून विदीशेकडे जाणा–या राजमार्गावरील ते एक प्रमुख स्थान होते. प्रभाकर देव यांच्या मते नंदगिरी ही सातवाहनांची पहिली राजधानी होती. नांदेडपासून केवळ पाच कि.मी. अंतरावर

असणा–या असरजंग या खेड्याजवळ सातवाहनकालीन अवशेष मिळाले आहेत. वाकाटकांच्या वात्सगुल्म या शाखेच्या काळात (इ.स. ३३०-५१०) नांदेड हे विषय मुख्यालय झाले. त्यामुळे नांदेडला राजकीय महत्त्व प्राप्त झाले. वाकाटक नृपती विंध्यशक्ती द्वितीय याच्या वाशीम ताम्रपटात "वाकाटकानां श्री विंध्यशक्तेखचेनात नान्दीकडस उत्तरमग्ये" असा नांदेडचा उल्लेख केलाआहे. एक शैक्षणिक केंद्र आणि विद्वानांचे माहेरघर म्हणून चालुक्य, राष्ट्रकूट व गंग या राजांच्या शिलालेख व ताम्रपटांमध्ये नांदेडचा गौरवपूर्ण उल्लेख आला आहे. कंधार येथील प्रसिद्ध राष्ट्रकूटकालीन शिलालेखात गोदावरी खो–यातील एक वैभवसंपन्न महानगर अशी नांदेडची प्रशंसा केलेली आढळते. कल्याणच्या चालुक्यांच्या काळात सेनापती भीम याने इथे शाळा व त्रैपुरुषांचे मंदिर बांधल्याचा उल्लेख आला आहे. लीळाचरित्रात या विषयी उल्लेख आढळतो. प्राचीन काळी नांदेड येथे गोदावरीकाठी काही घाट बांधले होते. यादवांच्या शिलालेखात काही घाट बांधल्याचा उल्लेख आढळतो. नांदेड मधील नाव घाट सर्वात प्राचीन असून प्राचीन काळी ते एक महत्त्वाचे नदीकाठचे बंदर असावे. येथून नाव म्हणजे होड्यांची वाहतूक होत असे. यापैकी ब–याचशा घाटांची पुनर्बांधणी करण्यात आली. यापैकी काही घाटांचे तर एकविसाव्या शतकात पूर्णपणे आधुनिकीकरण करण्यात आले. गोदावरीकाठी असलेल्या भावतिर्थाला महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांनी भेट दिली होती. महानुभावांच्या लीळाचरित्र या म्हाईंभटाने लिहीलेल्या ग्रंथात नांदेडचा उल्लेख आढळतो. या ग्रंथात नांदेडचे वर्णन केले आहे. चौदाव्या शतकात नांदेडच्या कायापालटाला सुरुवात झाली. नांदेड जवळ आराध्यपूर (अर्धापूर) हे उपमुख्यालय असणा–या यादवांचा उतरता काळ सु डिग्री झाला. देवगिरीच्या यादवांनंतर वारंगळचे काकतीय हे नांदेडवर राज्य करणारे शेवटचे हिंदू घराणे ठरले. पुढे मुसलमानांच्या पहिल्या आक्रमणात नांदेडवर मुसलमानी राजवट सु डिग्री झाली. काही वर्षांनंतर अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफूर याच्या साम्राज्यात नांदेडचा समावेश झाला. मुसलमानी आमदनीत नांदेड राजकीय हालचालीचे प्रमुख केंद्र झाले. या धुमश्चक्रीच्या काळात अनेक प्राचीन वास्तु नाश पावल्या. बहमनी कालखंडात दख्खनचा भाग चार सुभ्यात विभागला गेला त्यापैकी तेलंगण सुभ्यात नांदेडचा समावेश झाला. बहमनींचा वजीर महमूद गावान हा अतिशय शूर व कर्तबगार होता. त्याने नांदेड येथे बराच काळ वास्तव्य केले. त्याच काळात त्याने वजीराबाद ही पेठ वसवली. ही पेठ आधुनिक नांदेडच्या मध्यवर्ती वसली आहे. परंतु शहरात आज बहमनी कालखंडाची आठवण करून देणारी एकही वास्तु नाही. त्यानंतर काही काळ नांदेड विजापूरच्या आदीलशाहीच्या अमलाखाली आले. पुढे मुघलांनी निजामशाहीचा पाडाव केला व निजामशाहीचे राज्य मुघल साम्राज्यात विलीन झाले. तकमिल-ए-अकबरनामा या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे नांदेडच्या मातीत मलिक अंबर व मुघल यांच्यात अनेक लढाया झाल्या. औरंगजेब दख्खनचा सुभेदार असताना नांदेड सुभे तेलंगणचे सुभेदारी मुख्यालय होते. ही सुभेदारी पंचवीस वर्ष टिकली. पुढे औरंगजेब याने हे मुख्यालय बिदरला हलविले.

बिदरचा सुभा एकूण ६ सरकार व ७६ महालात विभागला गेला होता व नांदेड हे त्यापैकी एक सरकार होते. परंतु नांदेड हे सुभे तेलंगणचे नागरी मुख्यालय म्हणून कार्यरत राहिले. आता नांदेड, नांदेड सरकार झाले होते. नंदगिरी किल्ल्यात काही मुघलकालीन वास्तु आहेत. नांदेडने मुघल-मराठा संघर्षही अनुभवला. याच संघर्षाच्या काळात व–हाडला जात असता छत्रपती शिवाजी महाराजांनी नांदेडला भेट दिली होती. शिवाजी महाराजांनी नांदेड शहराला दिलेली ही भेट शहरात शिवाजी महाराजांचा एक मोठा अ वारुढ पुतळा उभारून संस्मरणीय केली आहे. अठराव्या शतकात नांदेड काही अतिशय संस्मरणीय व ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार झाले. या घटनांची स्मृती नांदेड मध्ये शिख गुरु गोविंदसिंघजी यांच्या आगमनाशी निगडीत आहे. सोधी तेज सिंघजी यांच्या -जन्म साखी॰ या पुस्तकात श्री गुरु गोविंदसिंघजी दक्षिणेकडे आले यामागच्या कारणांचा व घटनांचा उहापोह केला आहे. शिख तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी श्री गुरु गोविंदसिंघजी पंजाबला आले. तिथून ते धोलपूर, मथुरा, वृंदावन ही ठिकाणे फिरले. जवळ जवळ त्यांची ही भ्रमंती सहा ते सात महिने सुरु होती. या दरम्यान बहादूरशहाने दक्षिणेत उद्भवलेली बंडाळी मोडून काढण्यासाठी दक्षिणेत मोहीम काढण्याचा निर्णय घेतला आणि आपल्याबरोबर येण्याची श्री गुरु गोविंदसिंघजी यांना विनंती केली. श्री गुरुंनी ही विनंती मान्य केली व बहादूरशहाला पुढे जाण्याची सूचना केली व स्वत: मागाहून येईन असे सांगितले. जानेवारी १७०८ मध्ये शिख जथ्याबरोबर श्री गुरु गोविंदसिंघजींनी दक्षिणेकडे प्रयाण केले. धौलापूर, बुऱ्हाणपूर मार्गे ते हिंगोलीला पोचले. १७०८ मध्ये गुरुंचे नांदेडला आगमन झाले. कामरुनचा दक्षिणेतील वाढता प्रभाव नष्ट करण्यासाठी बहादूरशहा पुढे हैदराबादला गेला. सगळ्या ऐतिहासिक कागदपत्र व दस्तऐवजांनुसार श्री गुरु गोविंदसिंघजी यांचे नांदेडला आगमन झाले, तो दिवस होता १९ जुलै १७०८. या काळात श्री गुरु गोविंदसिंघजी यांचे नदीकाठावर विविध स्थानांवर वास्तव्य होते. अनेक लोकांनी व भक्तांनी त्यांच्या पवित्र दर्शनाचा लाभ घेतला व त्यांना अनेक अनुभव आले. त्यांचे आलेले अनेक अनुभव लोकस्मृतींमध्ये आख्यायिका म्हणून आजही जिवंत आहेत. हिरा घाट व नगीना घाट या स्थानांशी निगडीत असे काही पवित्र अनुभव आहेत. तर बंदा घाटाने बंदा बैरागी या गुरु गोविंदसिंघजींच्या एकनिष्ठ भक्ताच्या स्मृती जतन केल्या आहेत. १८ ऑगस्ट १७०८ मध्ये गुरु गोविंदसिंघांवर प्राणघातक हल्ला झाला. हा हल्ला सरहिंदचा सुभेदार वझिरखान याने घडवून आणला होता. त्याने गुरु गोविंदसिंघजींच्या मागावर दोन पठाण पाठविले होते. त्यांनी गुरुंवर हल्ला केला व गुरु गंभीररित्या जखमी झाले. गुरु गोविंदसिंघजींवर केलेल्या वैद्यकीय उपचारांचे संदर्भ आढळतात. दुर्दैवाने गुरुंची तब्येत ढासळतच गेली व ७ ऑक्टोबर १७०८ रोजी ते पंचतत्त्वात विलीन झाले. गुरु ग्रंथसाहिबला गुरु घोषित करण्याच्या प्रसंगाचे तपशीलवार वर्णन जन्म साखीत आढळते. त्यानुसार गुरु गोविंदसिंघजींवर हल्ला केल्यावर त्यांच्यावर ताबडतोब उपचार सुरु करण्यात आले. त्यांच्या जखमा बऱ्या होऊ लागल्या. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्यामुळे बंदासिंघ यांना पंजाबला

प्रयाण करण्याविषयी सूचना देण्यात आली. त्यांनी पंजाबला जाण्यासाठी प्रयाण केले व परिस्थिती बदलली. श्री गुरु गोविंदसिंघजींची प्रकृती खालावतच गेली. श्री गुरुंना परिस्थिती कळून चुकली म्हणून एके दिवशी त्यांनी शिखभक्तांना बोलावले व त्यांना नारळ आणि कुंकुमतिलक घेऊन येण्यास तसेच प्रसाद तयार करण्यास सांगितले. श्री गुरुंनी भक्तांना आपल्या पलंगाजवळ येण्याचा आदेश दिला. गुरु ग्रंथ साहिब नक्षीदार पीठावर ठेवण्यात आले. श्री गुरु गोविंदसिंघजींनी नारळ व पाच पैसे गुरु ग्रंथ साहिबांना अर्पण केले त्या भोवती तीन प्रदिक्षिणा घातल्या, त्यांच्यापुढे आपले मस्तक टेकविले व वाहेगुरु जी का खालसा असे उद्‌गार काढले. अशा रीतीने यापुढे श्री गुरु ग्रंथ साहिबांना गुरु म्हणून संबोधण्यात यावे असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. नांदेड येथेच श्री गुरु गोविंदसिंग यांनी अखेरचा श्वास घेतल्यामुळे नांदेड हे शिख धर्मीयांचे अतिशय पवित्र स्थान झाले आहे. इथे गुरुद्वारा बांधला असून श्री हुजूर अबचलगरसाहब सचखंड गुरुद्वारा म्हणून तो प्रसिद्ध आहे. पुढे निजामाने मुघलांबरोबर बंडखोरी केल्यानंतर इ.स. १७२५ मध्ये त्याने दख्खनमध्ये कायमचे वास्तव्य केले. या काळात नांदेड निजामाच्या हैद्राबाद राज्याचे भाग बनले. भारत स्वतंत्र होईपर्यंत म्हणजे १९४७ पर्यंत नांदेडचा समावेश हैदराबाद राज्यातच होत होता. स्वातंत्र्यानंतर हैद्राबादच्या निजामी राजवटीविरुद्ध पोलिस कारवाई केल्यानंतर नांदेड भारतीय संघराज्यात विलीन झाले. राज्यांच्या पुनर्रचनेनंतर मराठवाड्याचा भाग असलेला नांदेडचा भाग द्वैभाषिक मुंबई राज्याचा भाग झाला. शेवटी १९६० साली महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर नांदेडचा महाराष्ट्रात समावेश झाला. नांदेडला थोर ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. नांदेड हे संस्कृतच्या अभ्यासाचे केंद्र तर आहेच परंतु त्याचबरोबर विष्णुपंत शेष, रघुनाथ शेष व वामन पंडीत या सारख्या संतकवींची जन्मभूमीही आहे. नांदेड हे मूलत: दीर्घ ऐतिहासिक परंपरा लाभलेले एक महत्त्वाचे प्राचीन शहर आहे. परंतु कालौघात नांदेडचे प्राचीन स्वरुप पूर्णत: बदलून गेले आहे. आज अतिशय थोड्या प्रमाणावर नांदेड शहरात प्राचीन व मध्ययुगीन वास्तु व अवशेष उपलब्ध आहेत. नंदगिरी किल्ला हे एकमेव प्राचीन स्मारक आहे तर गेल्या शतकात बांधलेले संगमरवरी गुरुद्वारा शहरातील मुख्य आकर्षण आहेत. शहरात काही जैन शिल्पावशेषही आढळतात. त्यामुळे शहराचे प्राचीनत्व सिद्ध होते. मुख्य गुरुद्वारा व्यतिरिक्त शहरात सात गुरुद्वारे आहेत. हे सर्व गुरुद्वारे श्री गुरु गोविंदसिंघजी यांच्या स्मृतींशी संबंधित आहेत.

### ३. कृषी व पर्यटन :

कापूस, केळी, ऊस, आंबा, सोयाबीन, गोड लिंबू, द्राक्षे, पपई आणि ज्वारी हे नांदेडच्या आसपास पिकतात. कापूस उत्पादक उद्योगाला चालना देण्यासाठी नांदेडमध्ये प्रादेशिक कापूस संशोधन केंद्र आहे. परभणीच्या कृषी विदयापीठाच्या अंतर्गत एक कृषी शाळा कार्यरत आहे. या जिल्ह्यात दर वर्षी सुमारे एक कोटी पर्यटक येतात. त्यातले बहुतेक धार्मिक यात्रेकरू असतात.

## ४. वाहतूक व्यवस्था

नांदेड हे महाराष्ट्रातल्या इतर शहरांशी रस्त्यानं जोडलेलं आहे. शहरात विमानतळ आहे. शीख यात्रेकरूंसाठी नांदेड हे सर्वात लोकप्रिय ठिकाण आहे. नांदेड रेल्वे स्थानक भारतातल्या मुंबई, दिल्ली, पुणे, बेंगळुरू, कोलकाता, अमृतसर, भोपाळ, इंदूर, आग्रा, हैदराबाद, जयपूर, अजमेर, औरंगाबाद, नाशिक या शहरांशी जोडलेलं आहे.

## ५. पारंपारिक वाहतूक

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्याच्या ठिकाणांपासून नांदेड साठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची थेट बससेवा उपलब्ध आहे.

### ५.१. रेल्वे

नांदेड येथे दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय कार्यालय रेल विकास भवन चैतन्य नगर नांदेड येथे आहे हुजूर साहेब नांदेड रेल्वे स्थानक हे भारतीय रेल्वेच्या दक्षिण मध्य रेल्वे विभागात आहे आणि दिल्ली,मुंबई, पुणे, हैदराबाद, औरंगाबाद, बंगळूर, चेन्नई, चंदिगढ, जयपूर, बनारस, अलाहाबाद, विशाखापट्टणम, श्री गंगानगर, ओरिसा, हावडा, तिरुपती, कोल्हापूर, पटना, नागपूर येथून नान्देडसाठी थेट रेल्वेसेवा आहे. शीख भाविकांसाठी नांदेड ते अमृतसर अशी गाडी चालविण्यात येते.

### ५.२. हवाई

नांदेड येथे श्री गुरू गोविंदसिंग जी विमानतळ आहे. नांदेड हे हवाई मार्गाने दिल्ली, मुंबई, हैदराबाद, अमृतसर आणि तिरुपती या शहरांशी जोडले गेले आहे.

### ५.३. संस्कृती

येथील गोदावरी नदीच्या किनारी नंदी या महादेवाच्या वाहनाने नृत्य केले म्हणून या शहरास नांदेड असे नाव पडले आणि याच्या मुळेच इथे हिंदू संस्कृती अस्तित्वात आली. या शहरात प्रामुख्याने हिंदू,मुस्लिम आणि महत्त्वाची म्हणजे शीख धर्मियांची संस्कृती अस्तित्वात आहे. शीख धर्मियांच्या दहावे गुरू गोविंदसिंग यांचे समाधी स्थळ इथेच आहे ते म्हणजे सचखंड गुरुद्वारा यांच्यामुळेच इथे शीख संस्कृती वसली आहे.

## ६. नांदेड शहरातील महत्वाची पर्यटन स्थळे :

### ६.१. नंदगिरी ऊर्फ नांदेड किल्ला :

नंदगिरी ऊर्फ नांदेड किल्ला गोदावरीच्या अर्धचंद्राकृती वळणावर गोदावरीच्या डाव्या तिरावर होळी नावाने ज्ञात असलेल्या जुन्या वस्तीत आहे. हा भुईकोट किल्ला आहे.

**किल्ल्याचा इतिहास :** नांदेड शहराच्या प्राचीन इतिहासाचा साक्षीदार असणारे हे एकमेव स्मारक आज शहरात आहे. परंतु एकेकाळी वैभवशाली असलेल्या या नगरीतील हा किल्ला आज पूर्णपणे भग्नावस्थेत आहे. हा किल्ला कोणी बांधला असावा नक्की मत व्यक्त करणे कठीण आहे. या परिसरात

रुढ असलेल्या समजुतीप्रमाणे नंद घराण्यातील धनानंदाने हा किल्ला बांधला असावा व नंद या नावावरून शहरास नंदीनगर व किल्ल्यास नंदगिरी नाव मिळाले असावे. या नंदगिरी किल्ल्यावरही सातवाहन, राष्ट्रकूट, चालूक्य, यादव या नृपतींचा प्रभाव राहिला असला पाहिजे. मध्ययुगीन काळात नांदेड किल्ला नांदेड शहराबरोबरच खिलजी, तुघलक व नंतर बहामनी निजामशाही आदिलशाही या राजवटींकडे आळीपाळीने हस्तांतरीत झाला असला पाहिजे. नंतर मुघल व त्याही नंतर हैद्राबादच्या निजामाने हा किल्ला ताब्यात घेतला. १७०८ मध्ये उमदतुल मुल्ला खान फिरोझ जंग इथे सुभेदार होता. सुभे बिदरचाही तोच सुभेदार होता. सुभे तेलंगणाच्या सुभेदाराचे येथील एका इमारतीत वास्तव्य होते. सय्यद अब्दुल, साहुल्ला खान आणि अलीमुद्दीन खान यासारखे काही महत्त्वाचे सुभेदार १७ व्या शतकात किल्ल्यात वास्तव्य करून होते. खुदाबंद खान या नांदेडच्या सुभेदाराचे किल्ल्यात वास्तव्य होते. तो शाईस्तेखनाचा मुलगा होता. या किल्ल्याचे राजकीय महत्त्व हळू हळू कमी होत गेले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी या किल्ल्यात जलनि:स्सारण केंद्र सुरू करण्यात आले. इथे मुख्यत: पाणी शुद्धीकरण केंद्रे होती. निजामाने १९३६ साली सुरु केलेले हे बहुतेक मराठवाड्यातील पहिले जलशुद्धीकरण केंद्र असावे. किल्ल्यातील प्रचंड मोठ्या सभागृहात धातुच्या चार मोठ्या टाक्या बसविण्यात आल्या होत्या. मुंबईच्या कॅंडीपेटंट फिल्टर कंपनीने त्या बसवल्या होत्या. आज त्याही इथल्या ऐतिहासिक वारशाच्या भाग बनून गेल्या आहेत. आज किल्ल्यात कोणतेही प्राचीन अवशेष आढळत नाहीत. परंतु किल्ल्यावर विखुरलेल्या अवस्थेतील काही भग्न शिल्पावशेष व मंदिरांचे घटक अवशेष किल्ल्याच्या प्राचीनत्वाची कल्पना देतात. मूळातले प्राचीन शहर या किल्ल्याभोवती जमिनीखाली गाडलेल्या अवस्थेत आढळण्याची शक्यता आहे. या किल्ल्याचा विस्तार लक्षात घेता तसे किल्ल्याभोवतीच्या तटबंदीच्या चार भिंतीचे अवशेष पाहता जुने शहर किल्ल्याच्या परिसरातच वसले असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

**किल्ल्यास जाणारा मार्ग :** मनमाड-काचीगुडा रेल्वे मार्गावर नांदेड हे स्थानक आहे. रेल्वे स्थानकापासून ४ कि.मी. अंतरावर हा किल्ला आहे. येथपर्यंत जाणारा कायम रहदारीचा मार्ग आहे. अन्य ठिकाणावरून प्रवेश दुर्गम आहे. किल्ल्याच्या तीन बाजूस गोदावरीचे पात्र आहे. इथे गोदावरी वळण घेते. त्यामुळे पात्राचा उपयोग तटबंदीचे संरक्षण करणा–या खंदकाप्रमाणे होतो. किल्ल्यास एकच प्रधान प्रवेशद्वार आहे. ते किल्ल्याच्या उत्तर बाजूस आहे, मुख्य प्रवेशद्वारापर्यंत जाणा–या उतारावर दगडी फरशी आहे. मुळ प्रवेशद्वार नष्ट झाल्यामुळे आता नवीन बांधलेले आर.सी.सी. गेट आहे. किल्ल्यातून विशेष प्रसंगी बाहेर पडण्यासाठी त्याच्या दक्षिण तटास एक भूयारी मार्ग होता. हा मार्ग सरळ गोदावरीच्या पात्रापर्यंत येई. तो नंतरच्या काळात बंद करण्यात आला.

**किल्ल्यावरील वास्तु :** आज किल्ल्यात एक उल्लेखनीय उत्तर मध्ययुगीन काळातील वास्तु उभी आहे. या वास्तुस तत्कालीन शासकाचे प्रमुख कार्यालय असावे. या वास्तुपुढे पाण्याचा एक हौद व कारंजा

आहे. तर अन्य एका वास्तुचे रूपांतर निझामी राजवटीत शहरास होणाऱ्या पाणीपुरवठा व्यवस्था आणि जलशुद्धीकरण केंद्रात करण्यात आले आहे. आज किल्ल्यातील बहुतांश वास्तु अवशेष नष्ट झाले असून मुख्य तटालगत महानगरपालिका/नगर परिषद नांदेडची कर्मचारी निवासस्थाने आहेत.

**टेहळणीचे स्थान :** किल्ल्यास एकूण पाच प्रधान बुरुज आहेत. यापैकी तीन बुरुज नदीच्या बाजूला आहेत. या बुरुजांच्या पैकी गोदावरी पात्रालगत तीन असून हे प्रमुख टेहळणी केंद्र आहेत. यातील पूर्व दक्षिण कोपऱ्यावरील बुरुज सर्वात उंच असून याची वारंवार पुनर्बांधणी झाली आहे. या बुरुजावर निझामी राजवटीत एक छत्री बांधण्यात आली आहे हे प्रमुख टेहळणी केंद्र आहे. किल्ल्यास गोदावरीच्या अर्धचंद्राकृती वळणामुळे नैसर्गिक संरक्षण मिळाले आहे. या शिवाय मजबूत दगडाची तटबंदी आहे. एकच तट आहे. किल्ल्यास मुख्य पाच बुरुज आहेत. गोदावरीच्या पात्रालगतचे तीन बुरुज बांधतांना ते ढासळू नयेत यासाठी म्हणून तीन टप्प्यात काम केल्याचे दिसते. मुळात मातीच्या बुरुजाला दगड व गोटे यांचे आवरण चढविले आहे. तर पश्चिम-दक्षिणेकडील दोन बुरुज हे चिलखती बुरुज म्हणून संबोधता येतील. मुळ बुरुजावर पुन्हा मोठाल्या दगडी तंड्याचे एक संरक्षण कवच बांधले आहे तर या लगत किल्ला घाट नावाने ओळखला जाणारा दगडी घाट आहे. पात्रालगतच्या बाजूस मोठाल्या दगडी शिळांचे पायथ्याशी संरक्षण दिले आहे. पाण्याच्या माऱ्यापासून भिंती खचू नयेत हा त्याचा हेतू असावा. तट व बुरुजाचे शेवटच्या टप्प्यातील काम विट व चुन्यात केले आहे. नांदेड शहराच्या प्राचिनत्वाची साक्ष सातवाहन काळातील पुरातत्त्वीय अवशेष व स्थळे देतात. तर वाकाटक काळापासूनचे अभिलेखीय व ताम्रपटातील उल्लेख आहेत. गोदावरीच्या या वैशिष्ट्यपूर्ण अशा नाभिस्थानालगत नंदगिरी हे गोदावरीच्या पात्रातील व्यापारावर नियंत्रण ठेवणारे प्रमुख टेहळणी स्थान असावे. नंतर उत्तर काळात विशेषत: मध्ययुगात कंधार किल्ल्यावर शासन करणाऱ्या राजवटींनी विशेषत: मुघल काळात एक उपकेंद्र म्हणून याकडे पाहिले. याच काळात नांदेड किल्ल्याची आज दिसणारी तटबंदी उभारली गेली.

### ६.२. तख्त सचखंड श्री हुजूर अबचलनगर साहिब :

आज नांदेड जिल्हा हुजूर साहेब नांदेड या नावाने प्रख्यात झाला आहे, शीख धर्माचे गुरु श्री. गुरु गोबिंद सिंघजी महाराज यांनी सन १७०८ मध्ये या ठिकाणी आपला देह ठेवला. श्री. गुरू गोबिंदसिंह यांच्या समाधीस्थळी बांधलेला गुरुद्वारा **तख्त सचखंड श्री हुजूर अबचलनगर साहिब** आहे. त्याच सोबत शहरात एकूण १२ गुरुद्वारे असून त्यापैकी प्रमुख गुरुद्वारे म्हणजे गुरुद्वारा नगिना घाट साहिब, गुरुद्वारा बंदा घाट साहिब, गुरुद्वारा शिकार घाट साहिब, गुरुद्वारा बावली साहिब, गुरुद्वारा हिरा घाट, गुरुद्वारा माता साहिब, गुरुद्वारा माल टेकडी, गुरुद्वारा संगत साहिब, गुरुद्वारा नानकपुरी साहिब, गुरुद्वारा भजनगड साहिब. इ.स. २००८ साली येथे शीख धर्माच्या गुरुग्रंथ साहिब या ग्रंथास

धर्मगुरूचा सन्मान प्रदान केल्याच्या घटनेस तीनशे वर्ष पूर्ण झाल्याचा सोहळा 'गुरू-ता-गद्दी' संपन्न झाला.

**सचखंड गुरुद्वारा :**

शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंघजी नांदेड येथे १९ जुलै १७०८ रोजी आले. १८ ऑगस्ट या दिवशी त्यांच्यावर दोन पठाणांनी प्राणघातक हल्ला केला. हे पठाण सरहिंदचा सुभेदार वजिरखान याने पाठवले होते. या हल्ल्यानंतर ७ ऑक्टोबर १७०८ या दिवशी त्यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली. याविषयीची अधिकृत नोंद देणारे जे तत्कालीन साधनग्रंथ आहेत, त्यात गुरुशोभा हा ग्रंथ त्यांच्या वास्तव्याचा प्रत्यक्षदर्शी पुरावा आहे. तसेच ११ नोव्हेंबर १७०८ रोजी लिहिले गेलेले अखबारात-ए-दरबार-मुल्ला यात आणि औरंगजेबाच्या नंतर आलेला बादशहा बहादूरशहा विषयीच्या साधन ग्रंथातून या विषयीची नोंद मिळते. अन्य नोंदीपैकी काफीखान लिखित मुन्ताखिब-उल-लुबाब आणि तारिक-ए-बहादूरशाही या ग्रंथात महत्त्वाच्या नोंदी आहेत. तसेच गुरु गोविंदसिंघजी, बंदा बहादूर आणि मातासुंदरी यांचे हुकूमनामे यातील नोंदीही त्या अनुषंगाने आलेल्या आहेत. सन १८४० मध्ये कॅप्टन फिट्झेराल्ट याने नांदेड शहराला भेट देऊन काही नोंदी करून ठेवल्या आहे. त्यात तो म्हणतो गुरुद्वारा आहे त्या भागास शीखबाग म्हणून ओळखले जाते. तेथे प्रचंड बाभूळबन होते.

**असाधारण महत्त्व :**

सन १७०८ मध्ये गुरु गोविंदसिंघजी यांनी आपल्या अंतिम दिनापूर्वी तीन दिवस अगोदर ४ ऑक्टोबर १७०८ या दिवशी शिखांचा चिरंजीव गुरु म्हणून श्री गुरु ग्रंथ साहेब यांची स्थापना केली. त्यामुळे या धर्माच्या दृष्टीने या स्थानाला असाधारण महत्त्व आहे. ज्या स्थानावर गुरु गोविंदसिंघजी यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली त्याच स्थानावर सन १८३२ ते १८४० या काळात आज आहे ती वास्तु उभारण्यात आली. हैद्राबादेच्या निजामाने आपल्या प्रदेशातील बंड मोडण्यासाठी लाहोर येथील शीख रेजिमेंट बोलावून बंड मोडून काढले होते. या फलटणीतील काही सेनानी तसेच निझामाचा दिवाण चंदुलाल महाराज व पंजाबचे महाराज रणजितसिंग यांनी पुढाकार घेऊन ही वास्तु व वास्तु संकुलाची निर्मिती केली. हे तख्त सचखंड श्री हुजूरसाहिब अबचल नगर नांदेड संपूर्ण शीख समाजाला महत्त्वाचे वाटते. येथे होला मोहल्ला (होळीचा दुसरा दिवस) गुरु ता गद्दी श्री गुरु ग्रंथसाहेबजी (दिवाळी नंतरचे तीन दिवस) या काळात यात्रेकरु पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देतात. शिवाय गुरुनानक जयंती, गुरु गोविंदसिंग जयंती, बैसाखी, दसरा ह्या निमित्ताने येणाऱ्या यात्रेकरुंची संख्या वर्षकाठी तीन लाखांवर असते. गुरु ग्रंथसाहेब यांची गुरुपदी स्थापना झाल्यापासून अखंड नंदादीप (शुद्ध तुपातील) आणि ग्रंथासाहेबाचे पठण अविरत चालू आहे हे विशेष. यातून हा संपूर्ण परिसर आनंदी व पवित्र झाला आहे.

**गुरुद्वाराच्या वास्तुचे वर्णन :**

मुळात १९ व्या शतकामध्ये (सन १८३२ ते १८४०) निर्माण झालेली वास्तु व वास्तु संकुल हिंदू व मुघल कलाशैलीचा सुंदर समन्वय आहे. गुरुद्वाऱ्याची मुख्य वास्तु पश्चिमाभिमुख आहे. या वास्तुसंकुलाला प्राकार असून चार प्रवेशद्वारे आहेत. एका उंच चौथ–यावर मुख्य वास्तु उभी आहे. या वास्तुच्या मध्यभागी ७ x ७ मी. आकाराचा गाभारा (मुख्य खोली जेथे गुरु गोविंदसिंघजी यांची जीवनज्योत अनंतात विलीन झाली ते स्थान आहे. याला सिंहासन स्थान म्हणतात.) यात पवित्र शस्त्र व शास्त्र ठेवले आहे. गुरुद्वाऱ्याची मुख्य वास्तु उभारतांना पूर्व पश्चिम चार कमानी आणि उत्तर दक्षिण तीन कमानींची रांग उभारून त्यावर वास्तु निर्माण केली गेली आहे. मुख्य गाभाऱ्याचा पुढील भाग पहिल्या मजल्याच्या पातळीवर छत न घालता उघडा ठेवण्यात आला. त्याला प्रकाशस्थान म्हणतात. सभा मंडपाप्रमाणे ठेवलेला हा भाग येथे सतत गुरु ग्रंथसाहिब यांचे पठण पाठण सुरु असते. दुसऱ्या माळ्यावर खालील मुख्य खोलीच्या आकाराची एक खोली उभारून त्यावरील छतावर तिसरा माळा उभारला आहे. हे ठिकाण फक्त गाभाऱ्यावरील एका खोली एवढे आहे. येथे या चौरस आकाराच्या (७ x ७ मी.) वास्तुवर अष्टकोन तयार करून साधारणपणे पाच मीटर उंचीचा डोम (घुमट) उभारला आहे. हे संपूर्ण बांधकाम विट व चुन्यात केले आहे. एकूण वास्तुची उंची जमिनीपासून १५ मी. आहे. मुख्य चौथऱ्यावर उभारलेली वास्तु एकसंध वाटते. दोन्ही माळ्यांची एकत्रित उंची प्रथम नजरेत भरते. गुरुद्वारा या वास्तुची जी वैशिष्ट्ये सांगता येतील त्यात प्रामुख्याने गुरुद्वारा संकुलाचे काम भाजलेल्या विटात केले असून बांधकामात चुन्याचा उपयोग झाला आहे. यावरील उत्तम प्रतीचा गिलावा नजरेत भरतो. वास्तु उभारताना कमानींचा उपयोग केला असला तरी त्यावर आढळणारे छत काहीसे समतल ठेवण्याचा प्रयत्न झाला आहे. या स्थापत्यावर इस्लामिक वास्तुशास्त्राचा प्रभाव जाणवतो. त्याच्या बाहेरील चारही टोकांवर मिनार उभारले असून हे स्तंभ खालपासून वरपर्यंत सरळ अष्टकोनी आकारात कोरून वास्तुची शोभा वाढवण्यासाठी त्याचा उपयोग करून घेण्यात आला आहे. वास्तुच्या आतील बाजूने असलेल्या कमानी बाहेरून प्रथमदर्शनी जाणवत नाहीत. कमानींचा आभास होत असला तरी वास्तुचा एकसंधपणा नजरेत भरतो. भिंतींच्यावर हिंदू अलंकरण पद्धतीचा अंतर्बाह्य उपयोग केला आहे. विशेष म्हणजे चारही दिशांनी दरवाजे ठेवले असून मुख्य वास्तुच्या मागील भिंतीतून वरील मजल्यावर जाण्यासाठी जिने आहेत. वरील घुमट लक्षात येण्यापूर्वी चारही बाजूंनी पालखीच्या आकाराचे केलेले नक्षीकाम नजरेत भरते. यावर लहान कळसांची रांग आहे. गुरुद्वाराच्या वास्तुला चुन्याचा उत्कृष्ट प्रतीचा गिलावा करून त्यावर चित्रे काढलेली आहेत. यासाठी लाल, पिवळा व निळा रंग प्रामुख्याने वापरला आहे. ही चित्रे काढताना फ्रेस्को तंत्राचा उपयोग केला गेला असावा. चुन्याच्या गिलाव्यावर चित्र काढताना लाल रंगाच्या बाह्य रेषा काढून त्यात अन्य रंग भरले गेले. ही चित्रे मुळात दोन्ही माळ्यांच्या छतावर व घुमटाच्या आतील बाजूने काढली होती. नंतर पण

लगोलगच्या काळात पहिल्या मजल्याला म्हणजे मुख्य वीतानावर मिनाकारी केली गेली. यावर सुवर्णाचा पत्रा मोठ्या प्रमाणावर चढवण्यात आला.

**भौमितिक नक्षी :** कमानीदार छतास आतून मिनाकारी करताना काच, रंगीत दगडी चिपा यांचाही उपयोग केला गेला. विशेष म्हणजे उत्तर काळात विकसित झालेली मुघल चित्रशैली आणि या शैलीत काढलेली काचेवरील धर्मगुरुंची चित्रे येथे बसवण्यात आली. याखालील भागात संगमरवरी दगड नंतरच्या काळात बसवण्यात आला. संगमरवरावर इनलेवर्क केले आहे. यांत मुख्य दगड कोरून हिरवट काळा, हिरवा, लाल, निळा व क्वचित पिवळा रंगाचे मौल्यवान दगड बसवून विविध भौमितिक नक्षी तसेच हंस, पोपट यासारखे पक्षी दर्शवले गेले. याशिवाय गुरुद्वाराच्या मुख्य छतावरील घुमट, पहिल्या माळ्यावरील मुख्य खोलीतील भिंती व छत तसेच अन्य काही भागांत तांब्याचा पत्रा बसवून त्यावर मोठ्या प्रमाणात सोन्याचे पाणी चढवण्यात आले. किमान ५० किलो सुवर्ण यासाठी लागले असावे. यावरही विविध भौमितिक नक्षी व गुरुग्रंथसाहिब यातील काही श्लोक कोरले आहेत. या वास्तुपुढे एका अष्टकोनी चौथऱ्यावर उभा असलेला ध्वजस्तंभ २४.३८ मी. उंच आहे. त्यावर १.८२ मी. उंचीचा सोन्याचे पाणी दिलेला बाण आहे. एकूण ही मुख्य वास्तु आणि परिसर यांच विस्तार २.०२३ हेक्टर आहे. या परिसरातील मुख्य वास्तुची गेली कित्येक दशके सतत दुरुस्ती चालु आहे, दुरुस्तीचा भाग म्हणून संपूर्ण परिसरात नवीन लादी टाकली आहे. तसेच वास्तुच्या बाह्य भागावरील मुळात असलेला चुन्याचा गिलावा उतरवून नवीन संगमरवरी दगड तेथे बसवला. असे करत असताना मुख्य वास्तुवरील चुन्याच्या गिलाव्यावर असलेले नक्षीकाम जशास तसे संगमरवरी दगडावर करण्यात आले आहे. तसेच पहिल्या माळ्यावरील मिनाकारी आहे तेथील काही भाग आता बदलला आहे. सध्या गुरुद्वारा कमिटीने सुरु केलेल्या कामामुळे घुमटाच्या आतील भागातील काही चित्रे जी चुन्याच्या गिलाव्यावर काढली गेली होती ती आता मूळ स्थितीत नाहीत. मुळात गुरुद्वारा ही वास्तु महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्वव वस्तू संग्रहालय विभागाचे संरक्षित स्मारक आहे.

**गुरुद्वाराचे बदललेले स्वरूप :** गुरु ता गद्दी या त्रिशताब्दी महोत्सवाचे निमित्त साधून मूळ गुरुद्वारा परिसराचा विकास करण्यात आला आहे. संपूर्ण गुरुद्वारा परिसराचे स्वरूपच पालटून गेले आहे. यामध्ये गुरुद्वाराच्या आधुनिकीकरणाबरोबरच विस्तारीकरणही करण्यात आले आहे. या विस्तारीकरणासाठी जे लोक विस्थापीत झाले त्यांना अबचलनगर येथे वसाहतीत सदनिका देऊन नव्याने वसविण्यात आले. सध्याचे गुरुद्वारा संकूल १.८२ लाख चौ. मी. एवढ्या परिसरात विकसित करण्यात आले आहे. मूळ मुख्य इमारत तशीच ठेवून तिच्या अवती भोवती हा विस्तार करण्यात आला आहे. संपूर्ण बांधलेले क्षेत्रफळ ३ लाख चौ. फूट आहे. मुख्य गुरुद्वाराभोवती तळमजला अधिक दोन मजले या प्रकारचे चहूबाजूंनी वास्तु संकूल निर्माण केले आहे. या वास्तु संकूलात १६३ प्रशस्तकक्ष (२४० चौ. फूट), ९ परिपूर्ण गृहे (५८० चौ.मी.), २४ बहुउद्देशीय सभागृह (६०० चौ. फूट)आहेत. आतील

भागात संगमरवरी व सुनियोजित प्रांगण (कोर्ट यार्ड) केले आहे. मोठ्या संगमरवरी लाद्या, त्यांच्या बाजूने विकसित केलेले हिरवळीचे पट्टे व लहान शोभेची झुडपे, मध्ये लावलेली सावलीदेणारी झाडे, त्या भोवती बसण्यासाठी बांधलेले पार असे त्याचे भव्य, विलोभनीय स्वरूप आहे. देणारी झाडे, उन्हात फरशी तापते त्यामुळे चालण्यासाठी पायघड्या (कार्पेट) घातल्या जातात. गुरुद्वारातील आवागमनाच्या मार्गावर सहा कमान वजा अतिभव्य प्रवेशद्वारे उभारली असून त्यामुळे गुरुद्वारा परिसराच्या सौंदर्यात भर पडली आहे. इथे नियमीत लंगरसेवाही सुरु आहे. २०० चौ. फूट भागात असलेल्या लंगरच्या वास्तुची क्षमता २००० माणसे मावतील एवढी आहे. गुरुद्वाराच्या वास्तुसाठी नव्याने बांधलेले भव्य प्रवेशद्वार आर.सी.सी. स्तंभाच्या सहाय्याने उभारून त्यावर आकर्षक ग्रॅनाइट दगड बसविले आहेत.

**गुरुद्वारातील दैनंदिन पुजाविधी :** गुरुद्वारातील दैनंदिन पूजाविधी पुढीलप्रमाणे असतो. रात्री २ ते ३ श्री जपसाहेब व श्री सुखमणी साहेब यांचे पाठ होतात. बाहेर हे पाठ चालू असताना मणजी साहेब, शस्त्र व पोशाखांना पुजारी स्नान घालतात. स्नान गोदावरीच्या पवित्र पाण्याने घातले जाते. पाणी आणण्यासाठी खास माणूस ठेवला आहे. त्याला घागरीया म्हणतात. पहाटे ३ ते ६ प्रकाशस्थानी किर्तन सादर होते. सकाळी ६.१५ ते ७.३० च्या दरम्यान प्रकाश व भोग प्रसाद दाखवला जातो. नंतर सकाळी ६.४५ पर्यंत १० मिनीटे हुकुमनामाचे वाचन होते. सकाळी ८ वाजेपर्यंत किर्तन आनंद साहेब सादर केले जाते. यानंतर तासभर आधी श्री गुरु ग्रंथ साहेबजी कथा होते. सकाळी ८.३० ते १० च्या दरम्यान अखंड पाठाची समाप्ती केली जाते तसेच नव्याने अखंड पाठाची सुरूवात ३ वाजता दरवाजा उघडतो. श्री गुरु ग्रंथ साहिब या प्रकाश दशम ग्रंथ साहिबचा प्रकाश होतो व आसा दी वार या किर्तनाचा आरंभ होतो. बाहेर किर्तन चालू असताना दार लावून मुख्य पुजारी (जत्येदार साहेब) सिंहासन स्थानाला स्नान घालून त्यावर शस्त्र व पोशाख घालतात. सकाळी १०.३० ते ११.३० या काळात अमृत पान तर ११.०० ते दुपारी १२ पर्यंत भोग प्रसाद चढवला जातो. ही लंगरची वेळ असते. दुपारी १२ ते १ दरम्यान कथा दशम ग्रंथ साहेब सांगितली जाते. दुपारी २ ते ३ श्री उसतति या वाणीचा पाठ होतो. आणि भोग सरदई ४ वाजता दाखवला संध्याकाळी ४ ते ५ कथा गुरु इतिहासचे पठण केले जाते. त्यानंतर दोन तास किर्तन सोदर साहेब होते. त्यानंतर अर्धातास रहिरास साहिबचा पाठ होतो. तो संध्याकाळी ७.३० ला संपतो. ते झाल्यानंतर आरती आणि शस्त्रदर्शन (ऐतिहासिक आणि धार्मिक शस्त्रास्त्रे) व आरती होते. रात्री ८.३० ते ९ किर्तन सोहिला चौकी होते. रात्री ९ नंतर किर्तनासाठी आमंत्रित केलेल्या रागींकडून किर्तन होते व याबरोबर दिवस संपतो. परंतु दिवस रात्र सतत चोवीस तास अखंड पाठ सुरु असतो. गुरुद्वारातील लंगर २४ तास चालू असतो.

**गुरुद्वारामधील धार्मिक व ऐतिहासिक वस्तु:**

गुरुद्वारामध्ये अनेक ऐतिहासिक शस्त्रास्त्रे व मौल्यवान अलंकार आहेत. यामध्ये गुरु गोविंदसिंघजींची पुढील शस्त्रास्त्रे आहेत, सोनेरी छोटेकृपाण, तीर या शिवाय बाबा फुला सिंघजी, महाराजा रणजीत सिंघ व संत बाबा निधान सिंघजी यांच्या तलवारी आहेत. याबरोबरच अनेक शूरवीर सिंघांची नानाविध प्रकारची शस्त्रे जसे की तोफा, तलवारी, कट्यार, खंजीर, बंदुका, रिव्हॉल्वर्स व पिस्तुले आहेत. यापैकी गुरु गोविंद सिंघजींचे कृपाण,तीर, महाराजा रणजीत सिंघजी व बाबा फूला सिंघजी यांच्या तलवारी तेगा या शस्त्रांचे रोज रात्रीदर्शन घडवले जाते. गुरुद्वारात काही मौल्यवान जडजवाहिर आहेत. त्यामध्ये हार, हिरेजडीत कंकण, कलगी, अनेक कर्णभूषणे, आणि सोने व चांदीचे इतर दागीने आणि भांडी आहेत.

**गुरुद्वारात साजरे केले जाणारे विशेष उत्सव :**

गुरुद्वारात कार्तिक शुद्ध दुज, (गुरु गोविंदसिंघजींनी गुरु ग्रंथ साहिबला गद्दी दिली तो दिवस), कार्तिक शुद्ध पंचमी (गुरु गोविंद सिंघजींनी सचखंड गमन केले तो दिवस), कार्तिक शुद्ध पोर्णिमा (श्री गुरु नानक देवजी महाराजांचा जन्म दिवस), पौष शुद्ध सप्तमी संवत १७२३ (श्री गुरु गोविंद सिंघजी यांचा जन्म दिवस आणि वैशाखी (खालसा पंथाचा निर्माण दिवस) हे गुरुपुरब प्रामुख्याने साजरे केले जातात. गेल्या काही वर्षांपासून गुरुपुरब कार्तिक सुदी दुज व गुरुपुरब कार्तिक सुदी पंचमी या दिवशी विशेष मंडप वगैरे बांधून मोठ्या प्रमाणात उत्सव केला जातो. यावेळी संपूर्ण देशांतून मुख्य किर्तनी जत्थे, विद्वान, कवी, कथाकार नांदेडला येतात. हा उत्सव दिवाळीच्या दोन दिवसांनंतर सुरु होतो व पुढे पाच दिवस सुरु राहतो. याशिवाय इतरही काही उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे करण्यात येतात. दसरा आणि होळीच्या दिवशी (हल्ला बोल) लाखो शिख संगत पंजाब व इतर आसपासच्या तसेच दूरच्या प्रदेशातून येतात. यावेळी जलूस (मिरवणूक) काढण्यात येतो. यामध्ये खालसाचे निशान, गुरुंच्या घोड्यांची शोभा, आणि सिंघ शूरवीरांच्या कर्तृत्वाचे देखावे मिरवले जातात. वैशाखी, दीपावली, गुरु-ता-गद्दी, कार्तिकी पोर्णिमा व पौष सप्तमी या सणा दिवशीदेखील जलूस काढले जातात. दिवाळीच्या एक दिवस आधी तख्त स्नानाच्या वेळी विशेष प्रेम, श्रद्धा व उत्साह दिसून येतो. यावेळी सिंहासन साहेब मधील शस्त्र समूह साफ सफाईसाठी तसेच संगतला त्यांचे दर्शन देण्यासाठी बाहेर काढून ठेवण्यात येतो.

**गुरुद्वाराची व्यवस्था:**

गुरुद्वारा तख्त सचखंड साहिब आणि शहरातील इतर गुरुद्वारांची व्यवस्था प्रथम गुरु गोविंदसिंघजीं बरोबर आलेला सिंघ शिष्य परिवार करीत होता. गुरुगोविंदसिंघजींच्या परलोक गमनानंतर हा शिष्यपरिवार इथेच राहिला होता. परंतु हळू हळू या भागात वाढणाऱ्या तुर्कांच्या प्रभावामुळे अनेक सिंघ बांधवांनी पंजाबला परत जाण्याचा निर्णय घेतला. शके १८८० च्या दरम्यान हैद्राबादचे दिवाण चंदूलाल यांच्या मंजुरीनुसार उदासी शिख इथे सेवा करु लागले, आणि जेव्हा शेर

ए पंजाब महाराजा रणजीत सिंघजींनी इथे सेवेस आरंभ केला, तेव्हा सेवेसाठी अनेक आणि जेव्हा शेरे पंजाब महाराजा रणजीत सिंघजींनी इथे सेवेस आरंभ केला, तेव्हा सेवेसाठी अनेक कारागीर व स्वयंसेवक पंजाबमधून येऊन इथे राहिले. त्यापैकी काही इथेच स्थायिक झाले. नंतर हैद्राबादच्या निजामाने शेरे पंजाबकडून लाहोरी फौज मागवली तेव्हा त्या फौजेबरोबर आलेलेही अनेक लोक इथेच राहू लागले. शिखांच्या संख्येत वाढ होऊ लागली आणि मग हळू हळू उदासिंकडून पुजारीपण काढून घेतले गेले. उदासिंनी हैद्राबादच्या निजामाकडे याबद्दल फिर्याद केली तेव्हा निजामाने त्यांना अकोल्याजवळ जहागीरी दिली व ते तेथे जाऊन राहू लागले. इ.स. १९५६ पर्यंत गुरुद्वाराचे व्यवस्थापन सरकारच्या ताब्यात होते. स्वातंत्र्यपूर्व काळात डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस उर्फ निजाम इथल्या जनरल (मुख्य) व लोकल (स्थानिक) समितींचे अध्यक्ष होता. तो येथील संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळत होता. हळू हळू शिखांमध्ये जागृती निर्माण झाली आणि गुरुद्वाराला सरकारी नियंत्रणातून सोडवण्यासाठी प्रयत्न सुरु करण्यात आले. शेवटी २० सप्टेंबर १९५६ रोजी निजाम सरकारच्या गॅझेटप्रमाणे व्यवस्थापनासाठी " नांदेड सिख गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब बोर्ड " ची स्थापना झाली. हा गुरुद्वारा बोर्ड सतरा सभासदांचा आहे.

**व्यवस्थापन समिती (कमिटी ऑफ मॅनेजमेंट) :** या व्यवस्थापन समितीमध्ये, (१) नांदेडचा तहसीलदार किंवा राज्य सरकारने नियुक्त केलेले अन्य अधिकारी, (२) गुरुद्वाराचा अधिक्षक आणि नांदेडच्या शिख बांधवांपैकी बोर्डाने नामनिर्देशीत केलेले तीन सभासद यांचा समावेश होतो. व्यवस्थापन समितीचे कार्य बोर्डाने दिलेल्या नियमांप्रमाणे गुरुद्वाराचे दैनंदिन कामकाज चालवणे आणि गुरुद्वाराचे व्यवस्थापन योग्य व सुरळीतपणे चालविणे, हे आहे तर बोर्डाचे काम समितीच्या कामावर लक्ष ठेवणे तसेच गुरुद्वाराच्या मिळकतीचा उपयोग योग्य व सुनियोजीतपणे केला जात आहे की नाही यावर लक्ष ठेवणे हे आहे. याशिवाय गुरु-ता-गद्दीच्या त्रिशतक महोत्सवासाठी राष्ट्रीय पातळीवर एक विशेष समिती गठीत करण्यात आली होती.

**बुंगा माता भागो जी :** हा बुंगा तख्य सचखंड साहिबच्या पूर्व दिशेला गुरुद्वारा साहिबच्या हद्दीतच आहे. माता भागोजींची ऐतिहासिक शस्त्रे या ठिकाणी ठेवण्यात आली आहेत. माता भागोजी उच्च आचार-विचारांची स्त्री होती. त्यांचे मूळ गाव झबाल (जि. अमृतसर). जेव्हा काही शिख आनंदपूरच्या लढाईत गुरु गोविंद सिंघजींची साथ सोडून परत आले तेव्हा बायकांनी त्यांचा धिक्कार केला व आम्ही स्त्रिया लढाईच्या मैदानात जातो असे सांगून गुरु गोविंद सिंघजींच्या सेवेत रुजू झाल्या. यापैकी माता भागोजी पुरूषवेशात घोड्यावर स्वार होऊन मुक्तसरच्या लढाईत सामील झाल्या. माता भागोजींच्या प्रेरणेमुळे गेलेले शिख परत आले व युद्ध करून वीर गतिला प्राप्त झाले. या लढाईत भागोजी खूप शौर्याने लढल्या व त्यांनी अनेक घाव झेलले. गुरु गोविंदसिंघजी यांनी भागोजी यांच्या शौर्याची खूप प्रशंसा केली व त्यांना अमृतपान करवून त्यांचे नाव भाग कौर ठेवले. यानंतर त्या नेहमी पुरूषी पेशात गुरुंच्या

सेवेत राहिल्या व त्यांच्याबरोबर नांदेडला आल्या. गुरुंच्या सचखंड गमनानंतर त्या बिदरला गेल्या. तेथे त्यांनी बाळाराव व रुस्तमराव यांचे गाव जनवाडे येथे शिख धर्माचा प्रचार केला. जनवाडेलाच त्यांचा स्वर्गवास झाला. या ठिकाणी त्यांचे अंतिम स्थान आहे.

**अंगीठा भाई दया सिंघजी व भाई धरम सिंघजी, नांदेड :** गुरु गोविंदसिंघजींचे जे पाच प्रिय शिष्य (पंज प्यारे) होते त्यामध्ये भाई दया सिंघजी व भाई धरम सिंघजी हे दोघे गुरु गोविंदसिंघजींबरोबर नांदेडला आले व इथेच त्यांचा स्वर्गवास झाला. यांचा अंगीठा तख्त साहिबच्या अतिशय जवळ बुंगा माता भागोजीच्या मागच्या बाजूला आहे. भाई दया सिंघजी व भाई धरम सिंघजी नेहमी गुरु गोविंदसिंघजींच्या सहवासात राहिले व त्यांनी युद्धामध्ये शौर्य गाजवले.

**गुरुद्वारातर्फे करण्यात आलेले समाजकार्य :** गुरुद्वारातर्फे सामाजिक हित व जन कल्याण लक्षात घेऊन अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत. या योजनांचा उद्देश समाजाची प्रगती व्हावी तसेच जागृती व्हावी हा आहे.

**धार्मिक संगीत विद्यालय :** गेल्या चौदा-पंधरा वर्षांपासून हे धार्मिक संगीत विद्यालय कार्यरत आहे. या विद्यालयातर्फे फक्त आदीवासी व इतर मागास जातींना शिक्षण दिले जाते. विद्यालयात विद्यार्थ्यांना शिख धर्म, किर्तन आदी विषयांचे शिक्षण देण्यात येते.  विद्यार्थ्यांच्या अन्न, वस्त्र निवाऱ्याची सोय गुरुद्वारा सचखंड बोर्डद्वारा विनामुल्य केली जाते. याशिवाय गुरुद्वारातर्फे शिक्षणसंस्था चालविल्याआहेत.

**श्री हजूर साहिब आय टी आय :** सन १९८५ मध्ये गुरुद्वारा बोर्डने अजून एक शैक्षणिक केंद्र सुरु करून शिक्षण क्षेत्रात एक महत्त्वाची कामगिरी केली.

**तबेला :** गुरु गोविंदसिंघजी वस्तुसंग्रहालयाच्या उजव्या बाजूला एक विशाल इमारत गुरुसाहिबांचे घोडे सांभाळण्यासाठी तयार करण्यात आली आहे. सध्या इथे जवळ जवळ साठ घोडे आहेत. या शिवाय शहराच्या मध्यभागी असलेले गुरु गोविंदसिंघजी मेमोरियल हॉस्पीटल हे शासकीय जनरल हॉस्पीटल गुरुद्वारा बोर्डने गुरुद्वारा सचखंड साहिबच्या मालमत्तेतून दिलेल्या आठ एकर जमिनीवर उभे आहे.

**दुष्ट दमन प्रिंटींग प्रेस/सचखंड पत्र मासिक :** गुरुद्वारा बोर्डने दुष्ट दमन प्रिंटींग प्रेसचे आधुनिकीकरण केले आहे. इथे नवीन मुद्रण तंत्रज्ञानाचा अवलंब करून ऑफसेट युनिट बरोबर या प्रेस मध्ये संगणकाचा उपयोग केला आहे. गुरुद्वारा बोर्डशी संबंधीत सर्व प्रकाशने या प्रेसमधून छापली जातात. गुरुद्वारा बोर्डतर्फे प्रकाशित होणारे मासिक सचखंड पत्र १९८९ पर्यंत केवळ पंजाबी व इंग्रजी या भाषांतून प्रसिद्ध होत होते. परंतु १९९० पासून हे मासिक या दोन भाषांव्यतिरिक्त हिंदीतूनही प्रसिद्ध होऊ लागले आहे. या मासिकाचा खप इतर धार्मिक मासिकांपेक्षा कैकपटीने अधिक आहे. आज जवळजवळ पस्तीस देशांमध्ये या मासिकाचे वितरण होते.

**श्री गुरु गोविंदसिंघजी वस्तुसंग्रहालय :** या तीन मजली वस्तुसंग्रहालयासाठी जवळ जवळ तीन करोड रुपये इतका खर्च आला. यामध्ये ९ मोठी सभागृह आहेत. इथे नानाविध वस्तू प्रदर्शित केल्या आहेत. या संग्रहालयात चित्रांचे प्रदर्शन, पुरातन वस्तुंचे प्रदर्शन, शस्त्र प्रदर्शन व गुरु साहिबांची जुनी वस्त्र प्रावरण यांचे प्रदर्शन करण्याचा मानस आहे. यात लाईट आणि साऊंडच्या सहाय्याने गुरु इतिहास प्रस्तुत करण्याची योजना आहे. मध्यभागी जुन्या हस्तलिखितांचे प्रदर्शनही करण्यात येणार आहे.या वस्तू संग्रहालयाला सुंदर व भव्य बनविण्यासाठी दुर्मिळ ग्रंथ, चित्रे, छायाचित्रे, गुरु साहिबांची निशानी, शस्त्र किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या संबंधित वस्तू देण्यासाठी शिख संगतला तसेच संस्थांना आवाहन करण्यात येते.

**एन आर आय यात्री निवास :** श्री गुरु अंगद देव जी निवासाला लागूनच एन आर आय (अनिवासी भारतीय) साठी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. या निवासात १४७ आधुनिक वातानुकुलित खोल्या आहेत. एन आर आय यात्रेकरुंची गरज लक्षात घेऊन इमारतीत अनेक सोयीसुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

**पंजाब भवन :** या भव्य इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. ज्यामध्ये १४४ वातानुकूलीतखोल्या उपलब्ध आहेत.

**श्री गुरु ग्रंथ साहिबजी दिवान हॉल :** त्यामध्ये एकावेळी ७५०० भाविक किर्तन ऐकू शकतील.

मुख्य गुरुद्वारा व्यतिरिक्त शहरात सात गुरुद्वारे आहेत. हे सर्व गुरुद्वारे गुरु गोविंदसिंघजी यांच्यास्मृतींशी संबंधित आहेत.

**गुरुद्वारा, नगिना घाट :** गोदावरीच्या डाव्या काठावर मुख्य गुरुद्वारापासून अर्ध्या कि.मी.वर हा गुरुद्वारा आहे. ही एक सुंदर वास्तु असून आधुनिक संगमरवरी कलेचा व स्थापत्याच्या काही वैशिष्ट्यांच्या अविष्कार इथे आहे. ज्या काठावर हा गुरुद्वारा बांधला आहे तो नगिना घाट म्हणून ओळखला जातो. हे ठिकाण काही पवित्र स्थानांपैकी एक असून इथे काही काळ श्री गोविंदसिंघजींचे ओळखला जातो. हे ठिकाण काही पवित्र स्थानांपैकी एक असून इथे काही काळ श्री गोविंदसिंघजींचे वास्तव्य होते. इथे त्यांचे वास्तव्य असताना ते गोदावरी नदीवरील विविध घाटांना भेट देत असत. या घाटावर अनेक भक्त गुरु गोविंदसिंघजींचे दर्शन घेण्यासाठी येत असत. एकदा एका भक्ताने नगीना या सर्वात मौल्यवान रत्नाची गुरुंना भेट दिली. गुरुंनी ते रत्न नदीत फेकून दिले. भक्त गुरुंचे हे वागणे पाहून आश्चर्यचकित झाला. श्री गुरु गोविंदसिंघजींनी भक्ताला नदीत जाऊन ते रत्न परत आणण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे भक्ताने केले असता नदीत त्याला तशी अनेक मौल्यवान रत्ने दिसली. गुरुंना मौल्यवान रत्नाची भेट दिल्याचा त्याचा अहंकार नष्ट झाला व तो गुरुंचा एक नम्रसेवक झाला. या स्थानावरून गुरुजींनी बाण चालवून सतयुगी स्थान तख्त सचखंड श्री हजुर साहिबप्रगट केला.

**बंदा घाट गुरुद्वारा :** बंदा घाट गुरुद्वारा बंदा बैरागीच्या आठवणींशी व त्यांच्याशी निगडीत आख्यायिकांशी संबंधित आहे. बंदा बैरागीचे मूळ नाव लक्ष्मणदास होते. तो जम्मुच्या पुँछ या भागातील राजुरी येथील रजपूत घराण्यातील होता. पूर्व वयात त्याला शिकार करण्यात अतिशय रस होता. एका शिकारीच्या अनुभवाने त्याच्या स्वभावात बदल झाला व त्याने एका वैष्णव साधुचे शिष्यत्व पत्करले. तो आता माधवदास बैरागी म्हणून ओळखला जाऊ लागला. तो भ्रमंती करत नांदेडला आला व गोदावरीच्या काठी या घाटावर वास्तव्य करून राहू लागला. तो तांत्रिकही होता व आपल्या तंत्रविद्येचा त्याला अतिशय अभिमान होता. जेव्हा गुरु गोविंदसिंघजी नांदेडला आले तेव्हा आपल्या विद्येचे काहीप्रयोग त्यांच्यावर करण्याचा त्याने प्रयत्न केला. परंतु ते सगळे प्रयोग अयशस्वी ठरले. गुरुगोविंदसिंघजींची महती त्याला उमगल्यामुळे त्याने त्यांचे शिष्यत्व पत्करले. गुरुनीही त्याला अमृतची दिक्षा देऊन, एक नगारा, पाच प्रमुख शिष्य व पाच बाण देऊन गुन्हेगारांना सजा देण्यासठी पंजाबला पाठविले.

**मालटेकडी गुरुद्वारा :** मुख्य गुरुद्वारापासून जवळजवळ तीन कि.मी. वर मालटेकडी हा भाग आहे. या स्थानाचा ऐतिहासिक संबंध शिख धर्माचे संस्थापक श्री गुरु नानकदेवजी यांच्याशी जोडला आहे. सिंहलद्विप म्हणजेच श्रीलंकेला जात असता ते नांदेडला आले होते. वाटेत ज्या ठिकाणी त्यांनी वास्तव्य केले त्यापैकी एक मालटेकडी आहे. या ठिकाणी जमिनीखाली त्यांनी सोने पुरून ठेवले आहे असे म्हटले जाते. श्री गुरुगोविंदसिंघजी सुद्धा या स्थानाला भेट देत असत व इथे ध्यानधारणा करत असत. आपल्या अतींद्रिय शक्तीने ते पुरलेले धन बाहेर काढून संगत साहिब इथे ते वाटत असत असेही सांगितले जाते. त्यामुळे या टेकडीला मालटेकडी म्हणजेच धनाची टेकडी असे म्हटले जाते. एक आकर्षक असा संगमरवरी गुरुद्वारा इथे उभारला आहे. हा गुरुद्वारा अतिशय कलात्मक आहे.

**गुरुद्वारा संगतसाहिब :** नांदेडला आल्यानंतर श्री गुरुगोविंदसिंघजींनी काही काळासाठी याठिकाणी मुक्काम केला होता. गुरु गोविंदसिंघजी यांचा या जागेला कृपाशिर्वाद मिळाल्यामुळे हे स्थानपवित्र मानले गेले आहे. या स्थानाशी संबंधित आख्यायिका सांगते की बहादूरशहाच्या फौजांना खूपकाळ त्यांचे वेतन मिळाले नव्हते. याच ठिकाणी गुरुंनी मालटेकडी येथे मिळालेल्या सुवर्णमुद्रा ढालीने सैनिकांना वाटल्या. मुख्य गुरुद्वारापासून २ कि.मी. अंतरावर असलेल्या या संगमरवरी ऐतिहासिक वास्तुत अनेक कलात्मक वैशिष्ट्ये आहेत. या वास्तुच्या आजूबाजुचा परिसर रमणीय आहे.

**शिकारघाट गुरुद्वारा :** गोदावरीच्या काठावर असलेले शिकारघाट हे महत्त्वाचे स्थान असून याचा संबंध परंपरेने एका आख्यायिकेशी लावला आहे. श्री गुरु नानकदेवजी याचे शिष्य भाई मुलाखत्री यांचा या स्थानाशी संबंध आहे. गुरु गोविंदसिंघजी त्यांच्या वास्तव्यात या स्थानाला ते भेट देत असत. एका अशा भेटीदरम्यान त्यांना एक ससा दिसला. सश्याकडे पाहताच तो गेल्या जन्मीचा भाई मुलाखत्री असल्याचे व त्याच्या गेल्या जन्मातील कर्माची तो फळे भोगत असल्याचे त्यांना जाणवले.

श्री गुरु गोविंदसिंघजी यांनी त्याला कृपाशिर्वाद दिले व मुक्त केले. या पवित्र जागी गुरुंच्या अध्यात्मिक व अतींद्रिय शक्तीचा प्रयोग झाला. येथे असलेला सध्याचा संगमरवरी गुरुद्वारा संत बाबा जीवनसिंघजी व संत बाबा दलिप सिंघजी यांनी इ.स. १९७१ मध्ये बांधला असला तरी मूळ वास्तु एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस बांधली गेली होती. हा गुरुद्वारा बांधण्यासाठी ते दोघे खास पंजाबहून आले होते. हा गुरुद्वारा आणि नदीवर बांधलेला पूल संगतच्या कारसेवेची उत्कृष्ट उदाहरणे ठरावी. हा गुरुद्वारा रमणीय परिसरात एका छोट्या टेकडीवर आहे.

**गुरुद्वारा मातासाहिब :** हा गुरुद्वारा विसाव्या शतकात बांधला गेला आहे. याच्याशी निगडित असलेल्या कथेनुसार गुरु गोविंदसिंघजी यांची पत्नी मातासाहिब कौरजी यांचे नांदेडला वास्तव्य असताना त्या या स्थानाला नियमित भेट देत असत व तासन् तास इथे ध्यानधारणा करत असत. गुरुगोविंदसिंघजीही इथे येत असत व भोजन करत असत. त्यांच्या भोजनांच्या स्मृतीप्रित्यर्थ इथे लंगर असतो. त्यावेळेपासून आजतागायत इथे लंगर चालवला जातो. ही परंपरा जवळजवळ तीनशे वर्ष जुनी आहे. श्री गुरु गोविंदसिंघजींनी मातासाहिब कौरजींना दिल्लीला पाठविले. त्यावेळी गुरुंनी त्यांना एक तलवार आणि पाच शस्त्रे दिली व त्यांची रोज पूजा करावयास सांगितले. येथील गुरुद्वारा एक सुंदर संगमरवरी वास्तुशिल्प असून पारंपारिक व आधुनिक स्थापत्यशैलींचा मिलाप आढळतो.

**गुरुद्वारा हिराघाट :** श्री गुरु गोविंदसिंघजी नांदेडला ज्या ज्या स्थानी राहिले ती ती स्थाने ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठरली आहेत. गोदावरी नदीवरील हिराघाट हा गुरु गोविंदसिंघजी व सम्राट बहादूरशहा यांच्या भेटीसाठी प्रसिद्ध आहे. सम्राट बहादूरशहाने या स्थानी गुरुंची भेट घेऊन त्यांना मौल्यवान नजराणे भेट देऊन आपला आदर प्रकट केला होता. सम्राटाने गुरुंना एक उत्कृष्ट प्रतीचा हिरा भेट दिला. पण गुरु सर्व भौतिक सुखांच्या पलीकडेगेले होते. त्यांच्या लेखी हिऱ्याला अजिबात महत्त्व नव्हते. त्यांनी तो हिरा नदीच्या पात्रात फेकून दिला. ते पाहून सम्राट चक्रावला. तेव्हा गुरुंनी त्याला नदीकाठावर जाऊन हिरा परत आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे बहादूरशहा गेला असता नदीचा संपूर्ण काठ त्याला अनेक मौल्यवान व किंमती हिऱ्यांनी भरलेला दिसला. या ठिकाणी सम्राट बहादूरशहा गुरु गोविंदसिंघजींच्या समोर नतमस्तक झाला. त्याला याची खात्री पटली होती की चमकणारे वैभव शिखांना भुरळ घालू शकत नाही. गुरुनानक देवांच्या दरबारात कुठल्याही गोष्टीची वाण नाही. विसाव्या शतकात या घाटावर बांधला गेलेलाहा गुरुद्वारा आधुनिक स्थापत्याचा संगमरवरी चमत्कार ठरावा. मुख्य गुरुद्वाराबरोबरच गुरु गोविंदसिंघजी यांच्या स्मृतींनी पवित्र झालेले हे सात गुरुद्वारा नांदेडचे वैभव आहेत. या सात गुरुद्वारांशिवाय मुख्य सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वाराच्या मागे २ फर्लांग अंतरावर गुरु गोविंद बाग आहे. या ठिकाणी नव्याने गुरुद्वारा बांधला आहे. गुरु-ता-गद्दी सोहळ्याच्या निमित्ताने आठ एकराच्या परिसरात एक बाग निर्माण करण्यात आली असून शिख इतिहासाचे दर्शन घडविणारा लेझर शो येथे दररोज सायंकाळी दाखविला जातो.

**नांदेडमधील शिल्पवैभव :** नांदेडमध्ये काही मूर्तीशिल्पे सापडली आहेत. विविध कालखंडातीलही शिल्प शहराची कला परंपरा अधोरेखित करतात.

**जैन मंदिर :** जैन गल्ली सराफा परिसरात श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्रमंदिर आहे. मंदिरामध्ये अर्धापूर येथील तिर्थंकर आदिनाथांची मूर्ती ठेवण्यात आली आहे.

**केवल नृसिंह किंवा योग नृसिंह :** १२ व्या शतकातील या मुर्तीचे साम्य रामटेक (जि.नागपूर) येथे सापडलेल्या नृसिंह मूर्तीशी आहे. मूळात ही मूर्ती नंदगिरी किल्ल्यात होती. शहरातील होळी या भागात तळघरात एका छोट्या मंदिरात आता तिची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. योग नृसिंह आपले मूळ अवतारकार्य संपल्यावर म्हणजे हिरण्यकश्यपूचा वध करून स्थिर झाला आहे. जणूभक्तांसाठी असलेला हा नृसिंह योगासनात आहे. ही मूर्ती १२२ से.मी. उंचीची द्विभूज आहे. मूर्तीच्या बाजूला १५ सें.मी. उंचीची भक्त प्रल्हादाची मूर्ती आहे. नृसिंह सालंकृत असून मनगटात कडे तर दंडात बाजूबंद आहे. मूर्तीचा उजव्या पायाचा गुडघा वर उचलला असून डाव्या पायाची मांडी घातली आहे. एक हात जमिनीवर ठेवला असून दुस–या हातात चक्र आहे. लीळाचरित्रात नृसिंह मंदिराचाआहे. एक हात जमिनीवर ठेवला असून दुसऱ्या हातात चक्र आहे. लीळाचरित्रात नृसिंह मंदिराचा संदर्भ आहे. त्यानुसार मूळ मंदिर भावतीर्थाच्या लगत व उत्तराभिमुख असावे. काही अभ्यासकांच्या मते ते भावतीर्थाच्या उत्तरेस असलेल्या पांढरीच्या टेकडीवर असावे. गोदा नृसिंह या नावाने ओळखली जाणारी ही मूर्ती आता त्या भूयार सदृश्य मंदिरात आहे. सध्याचे मंदिर सतराव्या शतकातील असावे.

**केवल शिवमूर्ती :** नांदेड येथे कुंभारटेकडीवर आज परमेश्वर किंवा त्र्यंबकेश्वर म्हणून ओळखली जाणारी केवल शिवाची मूर्ती आहे. उमा-महेश्वर किंवा केवलशिव यांच्या प्रतिमा क्वचितचआढळतात. त्यामुळेच ही केवलशिवाची मूर्ती विशेष महत्त्वाची आहे.

**विष्णू मूर्ती :** श्री व्यंकटेश म्हणून ओळखली जाणारी एक विष्णू मूर्ती सिद्धपूरी येथील एका मंदिरात ठेवली आहे. हे मंदिर बिंदू माधव यांनी अलिकडच्या काळात बांधले असले तरी मूळ मूर्ती तेराव्या शतकातील आहे.

**माहेंद्री-इंद्रायणी :** राष्ट्रकूट काळात सप्तमातृकांची पूजा लोकप्रिय झाली होती. सप्तमातृकांपैकी एका मातृकेची माहेंद्री किंवा इंद्रायणीची मूर्ती चिखलवाडीत ठेवण्यात आली आहे. ही मूर्ती चतुर्हस्त असून खड्ग, पाश, त्रिशूल व ढाल धारण केलेली आहे. सध्या ही मूर्ती शितलादेवी म्हणून ओळखली जात असून सतराव्या शतकात स्थापन झालेल्या हत्तीवर आरुढ झाली आहे.

**नांदेड शहरातील मंदिरे :** गोदावरी नदीमुळे तिर्थस्थान म्हणून गणल्या गेलेल्या या शहरात गुरुद्वाराबरोबरच इतर अनेक छोटी मोठी मंदिरे, मठ आहेत.

**गंगा मंदिर :** होळीवर गोदावरीकाठी गंगामाता मंदिर आहे. गंगामातेची मूर्ती (४६ x १०से.मी.) संगमरवरी असून १९ व्या शतकातील आहे. हिला चार हात असून प्रदक्षिणा क्रमाने वरदहस्त अक्षमालायुक्त असून इतर तीन हातात कमंडलू, पद्म आणि पुस्तक धारण केलेले आहे. मुर्ती कंचुकी व सकच्छ वस्त्र अशा वस्त्रात आहे. ही गंगा म्हणजे गोदावरीच आहे.

**सरदेशपांडे राम मंदिर :** सरदेशपांडे घराण्याचे हे मंदिर नावघाट येथे एका जुन्या वाड्यामध्ये आहे.

**गायत्री मंदिर :** संत टेकडी भागात नव्याने (१९५४ साली) बांधलेले गायत्री मंदिर आहे. मंदिराला मोठा सभामंडप व गाभारा आहे. गाभाऱ्यात गायत्रीची पंचमुखी संगमरवरी मूर्ती प्रतिष्ठापित आहे. महाराष्ट्रातील हे एकमेव गायत्री मंदिर आहे. गायत्रीदेवीची पाच मुखे पंचतत्त्वांचे प्रतिनिधित्वकरतात. या मंदिरात चैत्र, अश्विन, आषाढ व माघ या चार महिन्यात येणाऱ्या चारही नवरात्री साजऱ्या करण्यात येतात. त्यावेळी घटस्थापना केली जाते. या शिवाय ज्येष्ठ शु. पंचमीला गायत्री जयंतीचा उत्सव होतो. देवीला चांदीचा मुकुट व छत्री आहे.

**ओंकारेश्वर मंदिर :** गोदावरीकाठी पेशव्यांच्या काळातील पश्चिमाभिमुख मंदिर आहे. गाभाऱ्यासमोर नंदी असून शेजारी एक समाधी आहे. या मंदिरासमोर एक दर्गा आहे.

याशिवाय नांदेड शहरात लहान मोठी गणेश मंदिरे, बालाजी मंदिरे, रेणुका मंदिर, विठ्ठल मंदिर,श्री राम मंदिर व अन्य देवतांची मंदिरे तसेच अनेक संतपुरुषाचे मठ आहेत.

बालाजी मंदिर : हे बालाजी मंदिर निजाम काळात बांधले आहे. मंदिराची रचना काहीशी जुन्यावाड्याप्रमाणे भासते. अतिशय भव्य सभामंडप, अर्धमंडप व गर्भगृह अशी मंदिराची रचना आहे. मंदिरात काळ्या पाषाणाची बालाजीची मूर्ती असून तिच्या उजव्या वरच्या हातात चक्र तर उजवाखालचा हात अभय मुद्रेत व डाव्या वरच्या हातात शंख व खालचा हात कमरेवर अशी आहे. यामूर्तीच्या दोन बाजूस जय व विजय यांच्या प्रतिमा आहेत. ही मूर्ती गरुडावर स्वार आहे. त्यामुळे इथे वेगळा गरुडध्वज नाही. हे या मंदिराचे एक वैशिष्ट्य आहे. या मूर्तीची स्थापना तिरुपती बालाजी येथील हाथीराम बाबांनी १७ व्या शतकात केली. या मंदिरात महंत परंपरा आहे. हे मंदिर पूर्णपणे खाजगी मालमत्ता असून जवळ जवळ शंभर वर्षापूर्वीदर दिवशी एक रुपया याप्रमाणे अनुदान मिळत होते. सध्या हे अनुदान बंद पडले आहे. या मंदिराला दोन सनदा मिळाल्या आहेत. दोन्ही सनदा फारशी भाषेत आहेत. त्यापैकी एक सनद राजा दुर्जनसिंग यांनी व दुसरी सरदार राजगोपाल यांनी दिली आहे. पहिलीचे वर्ष फसली ११८० व दुसरीचे फसली११८२ आहे. गोकुळाष्टमी व दसरा हे सण या मंदिरात मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. गोकुळाष्टमीच्या दिवशी पाळणा, भजन, पूजा, भंडारा हे कार्यक्रम असून त्या दिवशी हंडी फोडलीजाते. नवरात्रीचा उत्सव अश्विन शु. प्रतिपदेपासून सुरु होतो व दसऱ्या ला त्याची सांगता होते. दसऱ्याला बालाजीचा रथ निघतो. रथामध्ये बालाजीची पितळी मूर्ती असून भक्तगण रथ ओढतात.प्रथम रथ बालाजी मंदिराला पाच प्रदक्षिणा घालून नंतर

वजिराबाद येथील मारुती मंदिराकडे जातो. तिथले पुजारी देवाची पूजा करतात व रथ बालाजी मंदिरात परत आणला जातो. या मिरवणुकीला जवळ जवळ २०,००० लोक जमतात. कंधार येथेही एक बालाजी मंदिर असून ते मंदिर या मंदिराशी संबंधित आहे. कंधार येथील मंदिरापुढे अमृतकुंड आहे. याशिवाय शहरातील गाडीपूरा या भागात अजून एक बालाजी मंदिर आहे. मंदिर त्यामानाने अलीकडच्या काळातील आहे. मंदिर नक्षीकाम युक्त आहे. बाहेर पटांगणात गरुडध्वज आहे.

**बाळगीर महाराजांचा मठ :** गाडीपूराभागात बाळगीर महाराजांचा मठ आहे. बाळगीर महाराज मूळचे राहेरचे होते. नांदेड शहरात येऊन त्यांनी साधारण १००-१२५ वर्षांपूर्वी दत्त मंदीर बांधले. मंदिराच्या मूख्य गर्भगृहात मध्यभागी बाळगीर महाराजांची मूर्ती असून डाव्या बाजूस एकमुखीदत्त व उजव्या बाजूस अनसूया मातेची मूर्ती आहे. दुसऱ्या गाभाऱ्यात गणपतीची शेंदूरचर्चित प्रसन्नमुद्रेची मूर्ती आहे. मूर्ती उजव्या सोंडेची किंवा सिद्धीविनायकाची आहे. गाभारा अतिशय लहान असून दरवाजातून वाकून जावे लागते. मूर्तीच्या कपाळावर पाचू आहे. याशिवाय मंदिरात दत्ताची वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती आहे. हा दत्ताचा कलियुगातील अवतार मानला जातो. मठात गादीपरंपरा असून त्यानुसार महंतांची निवड केली जाते. येथे रोज अन्नदान केले जाते. तसेच पौर्णिमेला व दत्तजयंतीला यात्रा असते. यात्रेला ४-५ हजार लोक जमतात. याशिवाय इतर अनेक देवतांची लहान-मोठी मंदिरे शहरात आहेत. त्यापैकी त्रिकूटकरांचे गणपती मंदिर, चौफळ येथील विठ्ठल मंदिर, गाडीपूरा येथील संकटमोचन मारुती मंदिर उल्लेखनीय आहेत.

**मशीद :** शहरात सतराव्या शतकातील दोन मशीदी आहेत. त्यापैकी एक मालिक अंबरने बांधली असून दुसरी कुतुबशाही कालखंडातील आहे.

**जामा मशीद :** औरंगजेबाच्या काळातील ही मशीद असून तिच्या समोर प्रचंड मंडप आहे. इथे हजारो लोक नमाज पढू शकतात. कालानुरुप मूळ वास्तुमध्ये अनेक बदल व सुधारणा करण्यातआल्या आहेत. मशीदीत महमुद शाह साहेब यांचा दर्गा आहे. इथून जवळच कबरस्तान आहे.

**बडी दर्गा :** नांदेड रेल्वे स्थानकापासून ३ कि.मी.वर गोदावरी नदीकाठी हा दर्गा आहे. दर्गा १७ व्या शतकात बांधला गेला होता. मागील बाजूने दर्ग्याची इमारत काहीशी गोलाकार आहे. दर्ग्यामध्ये आता अनेक बदल करण्यात आले आहेत. मोहरमला इथे उरुस भरतो तेव्हा हजारो लोक जमतात.याशिवाय इतरही मशिदी व लहान दर्गे आहेत. रमझान ईद व मोहरमच्या दिवशी मशीद व दर्ग्यामध्ये नमाज पढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मुस्लिम बांधव जमतात.